# उपासनेचा क्रम

**एल** - पुढारी
**आर** - वाचक
**सी** - मंडळी

**प्रस्तावना**

**एकत्र येण्यासाठी आवाहन**

बहिणींनो आणि बंधूंनो, आम्ही पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावाने येथे जमलो आहोत.

बाप्तिस्म्याच्या पाण्याने, आम्ही ख्रिस्ताच्या शरीराचे सदस्य झालो आहोत, तरीही आमच्या पापांमुळे एकमेकांना वेदना आणि आघात झाला आहे.

आम्ही चांगले काम करण्यात अपयशी ठरलो आहोत.

आम्ही गंभीर अत्याचाराला तोंड देत न्याय मागितला नाही किंवा विधवा आणि अनाथांची काळजी घेण्याच्या देवाच्या आज्ञेकडे लक्ष दिले नाही (येशया 1:17).

आपण जमलो असताना, आपण आपल्या कृती आणि निष्क्रियतेवर चिंतन करूया आणि चांगले करायला शिकूया आणि न्याय मिळवूया.

आपल्या मतभेदांवर मात करण्यासाठी आणि आपल्या समुदायांच्या विघटनास कारणीभूत असलेल्या प्रणाली आणि संरचना उखडून टाकण्यासाठी आपल्याला देवाच्या कृपेची आवश्यकता आहे.

ख्रिस्ती या नात्याने आपल्यात असलेली एकता अधिक दृढ करण्यासाठी आम्ही प्रार्थना करण्यासाठी एकत्र येतो “आपले अंतःकरण उघडावे, जेणेकरून आपण धैर्यवान होऊन आपल्यामध्ये विपूल असलेला विविधतेचा खजिना शोधू शकू अशी आम्ही विश्वासाने प्रार्थना करतो.”

**भजन**

Many and great, O God (Dakota Hymn) (p. 15-16)

**स्वागताचे शब्द**

पापकबुली आणि क्षमा करण्यासाठी आमंत्रण

येशाया 1:12-18 च्या वाचनाद्वारे पापकबुली आणि क्षमा

(L) **पुढारी** : आम्हाला यशया संदेष्ट्याच्या शब्दांद्वारे आमच्या पापांची कबुली देण्यासाठी आमंत्रित केले आहे.

**वाचक** : तुम्ही माझ्या दर्शनाला येतं तेव्हा माझ्या अंगणातिल प्रत्येक गोष्ट तुडविता. असे करायला तुम्हाला कोणी संगितले ? माझ्यासाठी निरर्थक यज्ञबली देणे थांबवा, माझ्यापुढे जळणाऱ्या धुपाचा मला वीट आला आहे. (येशाया 1 : 12, 13 a WBTC Marathi)

**मंडळी** : हे देवा, तुझी उपासना करायला आम्ही नम्रपणे येत नाही, तेव्हा कृपाकरून आम्हाला क्षमा कर.

**शांतता :**

**वाचक 2** : चंद्रदर्शन शब्बाथ व सुट्टी याच्या निमित्ताने होणाऱ्या मेजवान्या मला आवडत नाही, धार्मिक सभेत तुम्ही करीत असलेली दुष्कृत्ये माला अजिबात पसंत नाहीत, तुमच्या मासिक सभा व मेळावे यांची माला मनापासून घृणा वाटते, या सभांचे मला ओझे झाले आहे. मी ह्याला कंटाळलो आहे. (येशया 1:13 b – 14 WBTC Marathi)

**मंडळी** : जगभरात जाणवणाऱ्या वसाहतवादाच्या दुष्कृत्यांमध्ये चर्चच्या सहभागासाठी आम्ही क्षमा मागतो.

**शांतता**

**वाचक 3** : प्रार्थना करण्यासाठी उचललेल्या तुमच्या हाताकडे मी लक्षं देणार नाही. तुम्ही कितीही प्रार्थना केली तरी ऐकणार नाही का? कारण तुमचे हात रक्ताने माखले आहेत. (येशया 1 : 15 WBTC Marathi)

**मंडळी** : हे देवा, आमच्या अन्यायी व अत्याचारांचा पापांसाठी ज्यामुळे तुझ्या सृष्टीतील वैविद्यापूर्ण सुसंवाद दडपला गेला, आम्ही तुझी क्षमा मागतो.

**शांतता**

(वाचना दरम्यान, भक्तीचालक पाण्याच्या भांड्याने बेसिन / हौदात हळू-हळू पाणी ओतणार)

**वाचक 4** : आपणास धुवा. स्वच्छ व्हा. तुमची दुष्कृत्ये थांबवा, माला वाईट गोष्टी बघायच्या नाहीत. चुकीचे वागू नका. चांगल्या गोष्टी करायला शिका. दुसऱ्यांची न्यायाने वागा. जे दुसऱ्यांना क्लेश देतात त्यांना शाक्षण करा. अनाथ मुलांना मदत करा. विधवांना सहाय्य करा. (येशया 1: 16-17 WBTC Marathi)

**मंडळी** : जसे आम्ही बापतीसमाच्या पाण्याने स्वच्छ धुतले गेलो आहोत, आम्हाला पुन्हा माफ कर आणि आमचा सृष्टिशी तसेच एकमेकांशी समेट होऊ दे.

**शांतता**

**वाचक 5** : परमेश्वर म्हणतो, “ या, आपणा या गोष्टींची चर्चा करू या. तुमची पातके कितीही काळीकुट्ट (शब्दश: शेंदरासारखी लाल ) असली तरी ती धुता येतील आणि तुम्ही हिमाप्रमाणे पांढरेशुभ्र व्हाल. जरी तुमची पापे लाल असली तरी तुम्ही शुभ्र लोकरीसारखे व्हाल. (येशया 1 : 18 WBTC Marathi)

**पुढारी** : देव त्याच्या दयेने तुम्हाला तुमच्या पापांपसून मुक्त करो, जेणेकरून तुम्ही न्याय करू शकाल. दयाळूपणावर प्रेम कराल आणि नम्रपाने आपल्या देवासोबत चालू शकाल.

**शांतता**

**पुढारी** : सर्वसमर्थ देव आमच्या प्रार्थना ऐकतो, आमच्यावर दया करतो आणि आमच्या पापांची क्षमा करतो.

**मंडळी** : देवाचे आभार मानतो.

## प्रार्थना

**पुढारी *:*** आम्हा सर्वांच्या देवा तुझ्यासमोर आमचा अन्यायीपणा आणि फूट पाडण्याचा पापांची कबुली देण्याची आम्हाला संधी दिली, आमची अंतकरणे व शरीरे ह्या दिलेल्या संधीबद्दल आभारी आहेत.

आम्ही सर्व मिळून तुज्याजवळ येतो; एक पवित्र कुटुंब म्हणून तुझ्या वैविध्यपूर्ण सुंदर अशा सृष्टीशी संयुक्त होतो. आमच्यामधून काही जण मुलनिवासी लोक आहेत,

आमच्यामधून काही जण गुलामांचे वंशज आहेत,

आमच्यामधून काही जण गुलाम बनावणारांचे वंशज आहेत,

आमच्यामधून काही जण स्थलांतरित आहेत,

आमच्यामधून काही जण निर्वासित आहेत;

परंतु आम्ही सर्व ख्रिस्ताच्या शरीराचे अवयव/ **भाग आहोत.**

आम्ही तुला धन्यवाद देतो कि, बाप्तिस्म्यच्या जीवंत पाण्याद्वारे शेंदरासारखी लाल आपम्ची पापे धुवून स्वच्छ करून दूर केली. आम्हाला बारे केलेस आणि आपल्या प्रिय समुदायाचा एक भाग केले, जो देवाचे कुटुंब आहे. आमच्या उत्पन्नाकर्त्या देवा आम्ही तुझी स्तुति करतो आणि तुला धन्यवाद अर्पण करतो.

या प्रवासात एकत्र होऊन आम्ही आपली अंतकरणे आणि डोळे समजुतीसाठी उघडे ठेवतो. पवित्र शाहणपणात वाटून सर्व लोकांना वाटून देतो आणि प्रवाहीत करून, एकता साजरी करतो.

एकदुसऱ्या सोबत ऐक्य स्वीकारण्यास आम्हाला मदत कर. आणि आम्हाला स्मरण राहू दे कि आम्ही या तुझ्या सृष्टीमध्ये, तुझ्या पवित्र आत्म्यामध्ये एकत्र झालेले असे एक कुटुंब आहोत.

**मंडळी :** आमेन.

पत्र वाचन इफिस्करांस पत्र 2:13-22

स्तोत्र 42 (प्रतिसादपूर्वक)

**वाचक :** हरणाला झऱ्याच्या पाण्याची तहान लागते . त्याचप्रमाणे देवा माझा आत्मा तुझ्यासाठी तहानेला आहे.

माझा आत्मा जिवंत देवासाठी तहानेला आहे. मी त्याला भेटायला केव्हा जाऊ शकेन ? (व 1, 2)

**मंडळी :** देवावरील आशेने, मी पुन्हा त्याची स्तुति करीन.

**वाचक :** रात्रंदिवस माझे अश्रुच माझे अन्न झाले आहे. सर्व वेळ माझा शत्रू थट्टा करून म्हणत आहे , “कुठे आहे तुझा देव?” (व 3)

म्हणून मला या सर्व गोष्टी आठवू दे. मला माझे मन रिकामे करू दे. जमावाला मी देवाचे मंदिरापर्यंत नेल्याची मला आठवण आहे. खूप लोकांबरोबर स्तुतीचे आनंदी गाणे गाऊन सण साजरा केल्याची मला आठवण आहे. (व 4)

**मंडळी :** देवावरील आशेने, मी पुन्हा त्याची स्तुति करीन .

**वाचक :** हे माझ्या जिवा, तू का खिन्न झालास ? तू आंतल्या आंत का तळमळत आहेस? देवाची आशा धर; तो मला दर्शन देऊन माझा उद्धार करितो. म्हणून मी त्याचे पुनरपि गुणगाण गाईन. (व 5)

**मंडळी :** देवावरील आशेने, मी पुन्हा त्याची स्तुति करीन.

**वाचक :** दिवसा व रात्रीही परमेश्वर त्याचे खरे प्रेम दाखवतो म्हणून माझ्याजवळ त्याच्यासाठी एक गीत आहे व एक प्रार्थना आहे. मी देवाशी, माझ्या खडकाशी बोलतो. मी म्हणतो "परमेश्वरा तू मला का विसरलास?"

माझ्या शत्रूंच्या क्रूरतेमुळे मी इतके दु:ख का सहन करावे?" (व 8,9)

**मंडळी :** देवावरील आशेने, मी पुन्हा त्याची स्तुति करीन.

**वाचक :** माझ्या शरीरावरील प्राणघातक जखमांमुळे माझे शत्रू माझी टिंगल करतात, ते मला सतत म्हणतात, ' तुझा देव कोठे आहे?"

हे माझ्या जिवा, तू का खिन्न झालास? तू आंतल्या आंत का तळमळत आहेस? (व 10, 11 a)

**मंडळी :** देवावरील आशेने. मी पुन्हा त्याची स्तुति करीन.

शुभवर्तमान पाठाचे वचन मत्तयकृत शुभवर्तमान 25 : 31 – 40

Hymn.

Come thou .......

Homily/Sermon प्रवचन(उपदेश)

शांतता किंवा एखादे भजन (Hymn)

दगड आणि गोष्टी

दोन किंवा तीन (गोष्ट) सांगणाऱ्यांना ओळखून पुढे बोलावणे.

**पुढारी :** चला आपण काही गोष्टी ऐकू या. एक जिवंत दगड म्हणून आम्ही ज्यांची साक्ष देतआहोत त्या गोष्टींचे जगात अस्तित्व राहिल. प्रत्येक गोष्टी सोबत , ख्रिस्ताच्या शरीराची (मंडळीची) बांधणी होते आणि सुधारणा होते. आमच्या गोष्टी ख्रिस्ताच्या गोष्टींसोबत एकत्र गुंफलेल्या आहेत, जो आमच्या ख्रिस्ती एकतच्या इमारतीचा कोनशीला आहे. देवाने जशी त्याच्या सहभागीतेत राहण्यासाठी आमची सृष्टी केली, त्याचप्रकारे आमच्या गोष्टी जोडलेल्या आहेत.

आपला दगड हातात घेऊन आम्ही जेव्हा या गोष्टी ऐकतो तेव्हा त्याच्यावर मनन चिंतन करू या.

(गोष्टी सांगणारे आपली साक्ष देतात. प्रत्येक गोष्टींनंतर भक्तजण खालील प्रमाणे उत्तर / प्रतिक्रिया देतात)

मंडळी : "चांगले करा आणि न्यायाने वागा" ह्या यशया संदेष्ट्या च्या आवाहनाला/ हाकेला प्रतिसाद देण्यासाठी मी स्वतः ला वचनबद्ध करतो आहे.

Hymn

What a Fellowship, what a joy divine (P. 19)

**मध्यस्थीच्या प्रार्थना :**

**पुढारी :** आम्ही विश्वासाने, प्रार्थने द्वारे परमेश्वरसमोर येतो, जो पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा आहे.

**पुढारी :** विश्वास आणि आत्मविश्वासाने, आम्ही प्रार्थनेद्वारा देवासमोर येतो, जो पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा आहे.

सृष्टीकर्त्या देवा, आम्ही आमच्या कार्यांच्या परिणामांसह जीवन जगत आहोत, ज्याने काहींचे जीवन जगणे असुरक्षित केले आहे तेर काहींकडे विपुल आहे.

तू आम्हाला दिलेल्या संसाधनाचा सर्वांच्या भल्यासाठी जबाबदारीने उपयोग आणि तुझ्या सृष्टीचा आदर कसा करावा हे आम्हाला शिकव.

विव्हळणारी सृष्टी तुला हाक मारत आहे.

**मंडळी :** आम्हाला शिकव आणि आम्हाला मार्ग दाखव.

पुढारी : हे दयाळू देवा, आम्ही एक दुसऱ्याला दुखावले आहे, तसेच तुझ्या लोकांमध्ये फूट निर्माण काली आहे, ती नीट करण्यास आम्हाला मदत कर. ज्याप्रमाणे येशू ख्रिस्ताने शीषयांच्या नव निर्मितीच्या समुदायाला जन्म देण्यासाठी पवित्र आत्म्याचा वर्षाव केला, तशाच प्रकारे तुझी कृपा आम्हावर पाठीव ज्यामुळे आमच्या मधील मतभेद मिटून जातील, आणि ज्यासाथी येशूने प्रार्थना केली, अशा एकतेचे वरदान आम्हाला दे.

**मंडळी :** आम्हाला शिकव आणि आम्हाला मार्ग दाखव.

**पुढारी:** मार्ग, सत्य व जीवन असणाऱ्या हे ख्रिस्ता, तुझ्या पृथ्वीवरील सेवेत तू केलेल्या चांगल्या कार्याद्वारे आम्हाला विभाजित करणाऱ्या भिंती तोडल्या आणि ज्या प्रतिकूल मतांनी आम्हाला कोंडून ठेवले होते त्यात न्यायला अंतर्भूत केलेस.

आम्ही जरी अनेक असलो तरी तुझ्यामध्ये एक आहोत हे ओळखण्यासाठी आमची अंतकरणे व माने उघड.

**मंडळी :** आम्हाला शिकव आणि आम्हाला मार्ग दाखव.

**पुढारी :** हे पवित्र आत्म्या या पृथ्वीला नवीन कर. हे पर्वत शिखरांनो, आकाशात गर्जना करणाऱ्या मेघानो, सरोवरातील लयींनो, आमच्याशी बोला.

**मंडळी :** कारण आपण एकमेकांशी जोडलेले आहोत.

**पुढारी :** ताऱ्यांचा निस्तेजपणा, सकाळचा ताजेपणा, फुलांवरील दव थेंबा, आमच्याशी बोला...

**मंडळी :** कारण आपण एकमेकांशी जोडलेले आहोत.

**पुढारी :** गोरगरीब, अत्याचारीत आणि उपेक्षितांच्या आवाजांनो आमच्याशी बोला...

**मंडळी :** कारण आपण एकमेकांशी जोडलेलो आहोत.

**पुढारी :** परंतु ह्या सर्वांच्यावर, आमची अंतकरणे उंच भराऱ्या मारत जेव्हा आम्ही तुझा धावा करतो, तुझी स्तुति करतो आणि म्हणतो, हे अब्बा पित्या...

**मंडळी :** हे आमच्या स्वर्गातील बापा ...

शेवटची प्रार्थना

**पुढारी :** हे शाश्वत देवा, ह्या एकत्र झालेल्या पवित्र समुदायाच्या मुखांकडे पहा. ह्यांना तुला जेथे पाहिजे तेथे कुठेही पाठव.

तुझ्या पवित्र आत्म्याने, तुझ्या सृष्टीसाठी त्यांनी स्वतःच्या गोष्टी सांगणे पुढे चालू ठेवण्यास, चांगली कृत्ये करण्यास, न्याय मिळविण्यास व न्यायाने वागण्यास, त्यांना प्रोत्साहीत कर.

त्यांनी मिळून एक होऊन व टिकून राहू दे, जेणेकरून जग विश्वास करील की, ह्या जगाच्या जीवनासाठी तू तझा एकुलता एक पुत्र येशूला पाठविले.

पुढे पाठवणे (आशीर्वाद)

**पुढारी :** परमेश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो आणि तुमचे रक्षण करो.

परमेश्वर त्याचा मुख प्रकाश तुमच्यावत पाडो आणि तुमच्यावर दया करो,

परमेश्वर त्याची कृपादृष्टी तुमच्यावर राखो आणि तुम्हाला शांति देवो.

**मंडळी :** आमेन